महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

विषय– फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत

* प्र क ट न *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

अ. क.	तपशील	उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा कालावधी	माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी
१)	लेखी परीक्षा	सोमवार, दि. ०८ फेब्रुवारी, २०२७ ते गुरुवार, दि. १८ मार्च २०२७	सोमवार, दि. १५ फेब्रुवारी,२०२७ ते सोमवार, दि. १५ मार्च, २०२७
२)	प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन	बुधवार, दि. २० जानेवारी २०२७ ते शनिवार, दि. ०६ फेब्रुवारी २०२७	गुरुवार, दि. २८ जानेवारी २०२७ ते शनिवार, दि. १३ फेब्रुवारी २०२७

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि.०६/११/२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक हे अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/११/२०२६

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

जा.क्र.छ.संविमं/माध्य.-अ/उमाक/ 5296 दिनांक:- 16/11/2026

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी/हिंगोली.

उपरोक्त प्रमाणे रा.मं.पुणे यांचे प्रकटनाची नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
विभागीय मंडळ,छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तव:
१.मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
२.मा.शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
३.शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, बीड,परभणी, जालना,हिंगोली.